महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/ COVID-१९/ ९०७९
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २८.०४.२०२१

# परिपत्रक

**विषय : महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६१ वा वर्धापन दिन समारंभ - १ मे, २०२१.**

**संदर्भ :** महावितरण परिपत्रक क्र. ९१८३ दि.२४.०४.२०२०.

महाराष्ट्र राज्य स्थापनेला दि. १ मे, २०२१ रोजी ६१ वर्षे पुर्ण होत आहेत. कोरोना (COVID-१९) या विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी या वर्षी राज्यात " **महाराष्ट्र दिन** " हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आयोजीत करणेबाबत शासन परिपत्रक सीईआर-२०२०/प्र.क्र.६५/३० दि. १५.०४.२०२० अन्वये निर्देश दिलेले होते. त्याअनुषंगाने सांघिक कार्यालयाने परिपत्रक क्र. ९१८३ दि.२४.०४.२०२० प्रसृत केलेले होते.

२. सन २०२१ करीता महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांच्या धर्तीवर या वर्षी देखील महावितरण कंपनीमध्ये " **महाराष्ट्र दिन** " अत्यंत साधेपणाने आयोजीत करण्यात यावा. तसेच सामाजिक अंतर राखण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेउन, जास्तीत जास्त ५ अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न करण्यात यावा.

३. तसेच, " **महाराष्ट्र दिन** " या दिवशी आयोजीत करण्यात येणारा गुणवंत कामगार पुरस्कार वितरण सोहळा हा दि. १ मे, २०२१ रोजी आयोजीत न करता सदरचा कार्यक्रम दि. १५ ऑगष्ट, २०२१ रोजी आयोजीत करण्यात यावा.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**